श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

वर्ष-८, अंक-२ | फेब्रुवारी-२०२० | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८

## डेरवण इंग्रजी शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये 'वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ' नुकताच उत्साहात संपन्न झाला. या वेळी डॉ. संपदा काळण, शास्त्रज्ञ, माऊंट साइनाई स्कूल ऑफ मेडिसीन, न्युयॉर्क, ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. या वेळी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीम. उज्ज्वला जुन्नरकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. शाळेच्या संचालिका श्रीम. शरयू यशवंतराव यांनी पाहुण्यांचा सत्कार केला व शाळेच्या वर्षभरातील प्रगतीचा आढावा घेतला. प्रमुख पाहुण्या डॉ. संपदा काळण यांच्या हस्ते शालेय, सहशालेय व क्रीडा स्पर्धांमध्ये नैपुण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

प्रमुख पाहुण्या डॉ. संपदा काळण यांनी सर्वप्रथम ह्या शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण, सहशालेय उपक्रम, अद्ययावत संगणक कक्ष, प्रयोगशाळा, दर्जेदार क्रीडासंकुलाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना क्रीडा प्रशिक्षण या सर्व उपक्रमांचे कौतुक केले व येथे केवळ शैक्षणिक नव्हे तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणला जात आहे असे प्रतिपादन केले.

डॉ. संपदा काळण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उच्च शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्या म्हणाल्या, ''उच्च शिक्षणाने चांगली नोकरी व चांगला पगार तर मिळतोच परंतु त्याचबरोबर व्यवसायाच्या अनेक संधी चालून येतात व आपल्याला कामाचा आनंद, समाधान देणारे क्षेत्र आपण निवडू शकतो. आपल्या कामाचा ठसा उमटवू शकतो.''




*प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करताना शाळा संचालिका शरयू यशवंतराव*




*बालकलाकाराचे कौतुक*

भारत व अमेरिकेतील शिक्षण पद्धतीबाबत बोलताना त्या म्हणाल्या की, अमेरिकेत घोकंपट्टीला वाव नाही. आपली कल्पकता, सर्जनशीलता, आत्मसात केलेल्या ज्ञानाचे उपयोजन याद्वारे प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात. त्यांनी विद्यार्थ्यांना भरपूर अवांतर वाचन करण्याचा मौलिक संदेश दिला. त्या म्हणाल्या, ''शास्त्रज्ञ, खेळाडू अशा प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांची, यशस्वी व्यक्तींची चरित्रे वाचली असता, त्यांनी केलेला संघर्ष, घेतलेले परिश्रम आपल्याला प्रेरणा देतात.''

डॉ. संपदा यांनी आपला शास्त्रज्ञ बनण्याचा प्रवास व त्यातील खडतर प्रसंग कथन केले. तसेच विद्यार्थ्यांना आपल्या आवडीचे क्षेत्र करिअर म्हणून निवडण्यास सांगितले. उच्च शिक्षणासाठी परदेशी विद्यापीठात प्रवेश घ्यायचा असेल तर त्यासाठी द्याव्या लागणाऱ्या GRE, TOFEL प्रवेश परीक्षांविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच परदेशात शिकायला जायचे असेल तर आपल्याला स्वत:ला सर्व कामे व सामाजिक व्यवहार करता येणे गरजेचे आहे असे सांगून अगदी जेवण करणे, स्वच्छता करण्यापासून बँक व्यवहार करण्यापर्यंत सर्व कामे पालकांनी आपल्या मुला-मुलींना शिकवावीत असा संदेश त्यांनी पालकांना दिला.



*विविध गुण दर्शन*




*विविध गुण दर्शन*




*विविध गुण दर्शन*




*पाहुण्यांचे मनोगत*

आपल्या भाषणाच्या शेवटी त्यांनी विद्यार्थ्यांना 'आव्हानांना तोंड देण्यास शिका व योग्य करिअर निवडा' असे सांगून अपयशाने खचून न जाता त्यातून शिका असे त्या म्हणाल्या. अपयशच यशाची पहिली पायरी असून आपण चिकाटीने व सातत्याने प्रयत्न करत राहिल्यास यश नक्कीच मिळते हे सत्य त्यांनी स्वानुभवातून अधोरेखित केले. 'कठीण काळ फार वेळ टिकत नाही पण कणखर माणसे टिकतात' असे उद्धृत करून डॉ.संपदा काळण यांनी आपल्या मौलिक भाषणाचा समारोप केला.

यानंतर विद्यार्थ्यांनी भारतातील विविध परंपरा, संस्कृती आणि लोककला यांचे दर्शन घडविणारा नृत्याचा बहारदार कार्यक्रम सादर केला. 'शिवतांडव' या संस्कृत स्तोत्राच्या भरतनाट्यम् नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. भारतातील एक महान साहित्यिक रवींद्रनाथ टागोर यांच्या जीवनातील प्रसंग विद्यार्थ्यांनी स्पॅनिश भाषेतून एका नाटिकेद्वारा सादर केला. ही नाटिका सर्वांसाठी लक्षवेधी ठरली. पर्यावरणाच्या रक्षणासाठी वृक्षतोड न करता वृक्षारोपण करावे हा संदेश देणारे नृत्य इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. नर्सरी, ज्युनियर के.जी. आणि सिनियर के.जी.च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'असावा सुंदर चॉकलेटचा बंगला, किलबिल किलबिल पक्षी बोलती, कोणास ठाऊक कसा' यासारख्या बालगीतांनी प्रेक्षकांच्या बालपणीच्या स्मृती जागृत केल्या. त्याचबरोबर सिनियर के.जी.च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'आओ बच्चो तुम्हे दिखाऐ' या देशभक्तिपर गीताने सर्वांची मने जिंकली. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी रचलेल्या 'ने मजसी ने' या गीतावर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. यासोबतच विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीते, इंग्रजी गाण्यांवर आधारित नृत्ये, लोकगीते, म्युझिकल इन्स्ट्रुमेंटवरील नृत्य, फॅन नृत्य, योगासनांवर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री अशोकराव जोशी, संस्थेतील इतर मान्यवर व पालक मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते. शाळा संचालिका श्रीम. शरयू यशवंतराव यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका श्रीम. प्रज्ञा पारकर, श्रीम. उज्ज्वला जुन्नरकर, श्री. कल्पेश जुवेकर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

**करविती गुरू तें तें असे होत । ... एक अभिप्राय –**

"करविती सद्गुरू ते ते होत असे...२५५ पाने वाचून झाली आहेत. हॉस्पिटलचा विस्तार आणि मेडिकल कॉलेजची उभारणी हा भाग सध्या वाचतोय. अद्भुत आहे हे सर्व. श्री काकांना तर १००० वेळा साष्टांग नमस्कार घातला तरी कमीच होईल. याबाबत मी काही बोलावं इतकी माझी योग्यता नाही. श्री काकांना प्रणाम. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्या कामाचे पुरेपूर, सखोल आणि सर्वांना समजेल अशा सोप्या भाषेत तुम्ही वर्णन केले आहे. ते वाचून स्तंभित व्हायला होते. खूप सुंदर लिहिले आहे तुम्ही. काही मेडिकल टर्मस् आहेत, बांधकामातील बारकावे आहेत. अनेक क्लिष्ट गोष्टी तुम्ही सोप्या करून सांगितल्या आहेत. सर्वसामान्य माणसाला ते सहज समजू शकते. त्याच्या डोळ्यासमोर सर्व स्पष्ट चित्र उभे राहते "

**– हर्शल मळेकर, मुंबई (पत्रकार)**

# श्रीमती दुर्गा गाडगीळ यांची कार्यशाळा



*दुर्गा गाडगीळ – कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात बोलताना*

श्रीमती दुर्गा गाडगीळ या टाटा मेमोरिअल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲन्ड रिसर्च काउन्सिल (TRAC) च्या सल्लागार आहेत. टाटा मेमोरिअल सेंटरच्या होमी भाभा नॅशनल इन्स्टिट्युटने चालविलेल्या दोन वर्षांच्या 'M.Sc. in Clinical Research course' च्या मुख्य समन्वयक आहेत. त्या GCP Trainer असून त्यांनी अनेक कार्यशाळा आणि चर्चासत्रे आयोजित केली आहेत. सन २०१७ मध्ये त्यांनी ‘टाटा मेमोरिअल हॉस्पिटल’मध्ये ‘नॅशनल कॅन्सर ग्रीड कॉन्ट्रॅक्ट रिसर्च ऑर्गनायझेशन’ (NCG CRO) ची स्थापना करण्यात महत्त्वाचा वाटा उचलला. या संस्थेच्या आर्थिक मदतीने सुरू असलेल्या नऊ संशोधन प्रकल्पांचे त्या नियंत्रण करीत आहेत. औषधिनिर्माण उद्योगातील ३१ वर्षांच्या सेवेतून त्या २०१५ साली निवृत्त झाल्या. त्या वेळी त्या Area Head, Asia Pacific, Regional Medical Monitoring Organization, Pfizer या पदावर कार्यरत होत्या. त्या certified NABH assessor for NABH Accreditation Standards for Clinical Trials (Ethics Committee, Investigator, and Clinical Trial Site) आहेत.

दि. १९ जानेवारी २०२० रोजी दुर्गा गाडगीळ यांनी आपले सहकारी श्री. शिर्श यांच्यासह वालावलकर रुग्णालयाला भेट दिली आणि 'Good Clinical Practise' या विषयावर कार्यशाळा घेतली. कार्यशाळेचे सकाळचे पहिले सत्र ‘इथिकल कमिटी’चे सदस्य, डॉ. बाणावली, डॉ. नाडकर्णी, डॉ. सुवर्णा पाटील आणि अन्य यांच्यासाठी घेण्यात आले. दुपारचे सत्र वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि नर्सिंग कॉलेज यामधील टिचिंग स्टाफसाठी घेण्यात आले. संशोधन प्रकल्पांविषयीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे विवरण या वेळी करण्यात आले. सहभागींची कार्यशाळेआधी आणि नंतर लहानशी चाचणीही घेण्यात आली.



*कार्यशाळेचे दुसरे सत्र*

# पत्रकार इंदुमती मिलिंद गणेश सूर्यवंशी यांची रुग्णालयाला भेट

दि. १३.१.२०२० ला दै. लोकमतच्या पत्रकार इंदुमती मिलिंद गणेश सूर्यवंशी व त्यांचे सहकारी आदित्य बेहल यांनी भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाला भेट दिली. इंदुमती सूर्यवंशी यांना राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महसंचालनालयातर्फे दिला जाणारा २०१८चा कोल्हापूर विभागाचा 'ग.गो.जाधव उत्कृष्ट पत्रकार' पुरस्कार मिळाला आहे. पत्रकारितेचे पदव्युत्तर शिक्षण घेऊन या क्षेत्रात आलेल्या इंदुमती सूर्यवंशी या 'लोकमत'मध्ये गेली दहा वर्षे काम करीत आहेत. त्यांना यापूर्वीही हाच पुरस्कार २०१४ साली मिळाला होता. 'लोकमत' मध्ये मुख्यत: त्या सांस्कृतिक व धार्मिक घडामोडींचे वार्तांकन करतात. त्यांनी दिलेल्या बातम्यांमुळे अनेक व्यक्ती व संस्थांनाही भरीव मदत झाली.

वालावलकर रुग्णालय गेल्या २०वर्षांपासून सामाजिक कार्य करत आहे याची दखल घेत सूर्यवंशी व त्यांचे सहकारी यांनी इथे राबविल्या जात असलेल्या विविध योजनांची माहिती घेतली. गरोदर मातांकरिता राबविला जाणारी वालावलकर यशोदा योजना, वालावलकर लड्डू गोपाल योजना, ० ते ६ वयोगटातील बालकांसाठी तसेच किशोरवयीन मुले आणि मुलींसाठी वालावलकर सुकन्या योजना, डेरवणचे पौष्टिक लाडू या साऱ्या योजनांची माहिती घेतली. या सर्व गोष्टीचे अगदी मनभरून त्यांनी कौतुक केले व वालावलकर रुग्णालयाची प्रशंसा केली.




*(डावीकडून) डॉ. प्रकाश कुलकर्णी, रूपाली चव्हाण, स्वाती सोनावणे, पत्रकार इंदुमती सुर्यवंशी आणि डॉ. आसावरी मोडक*

**करविती गुरू तें तें असे होत । ... काही अभिप्राय –**

"..हे पुस्तक वाचताना मन सतत भरून येत होते. सद्गुरूंवर अविचल श्रद्धा व समर्पित गुरुसेवेचे प्रत्यक्ष उदाहरणच होय ! सारेच काही, पूजनीय, वंदनीय, अनुकरणीय, अलौकिक अविस्मरणीय ! वर्णन करायला शब्द थिटे पडतात ."

**– डॉ. सौ. शुभांगी वि. फाटक, दापोली**

'सद्गुरूच्या संगे शिष्य बी घडला, शिष्य बी घडोनी सद्गुरू जाहला' या उक्तिप्रमाणे सद्गुरू परंपरेतील या सुंदर आणि कर्तव्यतत्पर उत्तुंग कार्यप्रवासाच्या चढत्या आलेखाचा आढावा म्हणजे 'करविती गुरु तें तें असे होत' हे पुस्तक होय. श्री काका महाराजांनी आपले सद्गुरू श्री सहजानंद सरस्वतीमहाराज आणि श्रीबाबामहाराज यांच्या कार्याला आपले जीवन वाहून घेतले आहे. अत्यंत निरलसपणे घेतलेले कठोर परिश्रम आणि वैदिक, अध्यात्मिक तसेच सामाजिक कार्यातील त्यांचे अजोड योगदान यांची साक्ष म्हणजेच आज संस्थेची वेगाने परिपूर्णतेकडे चालू असलेली घोडदौड होय! श्री काका महाराजांनी अनेक क्षेत्रातील विद्वानांच्या बुद्धिला आकर्षित करणारे; प्रसंगी आव्हानात्मक ठरणारे उपक्रम राबविण्यासाठी दाखविलेली कल्पकता यांचा सबंधित सर्वांनाच झालेला फायदा केवळ अमूल्यच नव्हे तर चिरकाल आहे.

विविध उपक्रमांची उभारणी करताना आलेल्या अडचणी आणि त्यावेळी श्री काका महाराजांनी सांगितलेली महत्त्वाची गोष्ट – 'अडचणी या आल्याच पाहिजेत. त्यामुळे मेंदू तल्लख राहतो. संस्थेला जिवंतपणा येतो!' हे वाचताना खूप प्रेरणा मिळते. एकूणच श्री विजयकाका जोशी यांनी घेतलेला हा नेटका, सुबक लेखनबांधणीचा आढावा अतिशय प्रेरणादायी ठरला आहे.

**– प्रा. डॉ. नेहा देशपांडे, पुणे**

# नर्सिंग कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन

प्रतिवर्षाप्रमाणे सन २०२० चे भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाच्या नर्सिंग कॉलेज, कॉलेज ऑफ अॅडव्हान्स्ड स्टडीज व समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्युटचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. १९ जानेवारी २०१८ या दिवशी जल्लोषात साजरे झाले. सुप्रसिद्ध अभिनेत्री पल्लवी वैद्य या प्रमुख पाहुण्या होत्या. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यानंतर डॉ. सुवर्णा पाटील, मेडिकल डायरेक्टर यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. रुग्णालयात असलेल्या निरनिराळे विभाग, त्या विभागात कार्यरत असलेले कर्मचारी, नर्सिंग कॉलेजच्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थीनी यांचा पारितोषिक वितरण समारंभ झाला. स्नेहसंमेलनात असलेला जोष व विविध गुणदर्शनात आपली कला सादर करणाऱ्या कर्मचारी कलाकारांचा उत्साह पाहून आलेल्या पाहुण्या अतिशय आनंदित झाल्या. आपल्या भाषणात त्यांनी रुग्णालयातील अद्ययावत सुविधा, क्रीडासंकुल आदींविषयी संतोष व्यक्त केला. येथे इंग्लिश बरोबर स्पॅनिश आणि जर्मन भाषाही शिकविली जाते याविषयी कौतुक करून लहान होऊन येथे शाळेत प्रवेश घ्यावा असे मला वाटते असे उद्गार त्यांनी आपल्या भाषणात काढले.



*प्रमुख पाहुण्या पल्लवी वैद्य क्रीडासंकुलात*



*गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार*




*आरोग्य संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार,*
*सोबत डॉ. विजय डोमले आणि शरयू यशवंतराव*



*प्रमुख पाहुण्या शिवसृष्टीमध्ये*




*आपले मनोगत मांडताना पल्लवी वैद्य*

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या तालुका आणि जिल्हास्तरीय स्पर्धा जल्लोषात संपन्न

'एसव्हीजेसीटी' क्रीडासंकुलात दि. २२ व २३ डिसेंबर २०१९ रोजी प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी आयोजित तालुकास्तरीय आणि दि. ०८ व ०९ जानेवारी २०२० रोजी जिल्हास्तरीय हिवाळी क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील ग्रामीण भागातील खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत मोठ्या गटाच्या म्हणजेच १७ वर्षाखालील आणि लहान गटाच्या म्हणजेच १४ वर्षाखालील मुले आणि मुलींसाठी मैदानी खेळ, खो-खो, कबड्डी तसेच लंगडी या खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. ''डेरवणच्या या अत्याधुनिक क्रीडानगरीत ग्रामीण विद्यार्थ्यांना खेळण्याची संधी दिल्याबद्दल संस्थेचे सर्व ग्रामीण विद्यार्थ्यांवर ऋण आहे आणि ते पुढे विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये मैदाने गाजवूनच फेडता येईल.''



क्रीडास्पर्धांचा जल्लोष

अशा भावना या वेळी आवर्जून उपस्थित असलेले रोहन बने (सभापती शिक्षण व अर्थ समिती तथा अध्यक्ष) यांनी व्यक्त केल्या. या स्पर्धेत रत्नागिरी जिल्ह्याच्या विविध तालुक्यांतील ग्रामीण भागातील खेळाडूंना आपले क्रीडानैपुण्य दाखवण्याची संधी मिळाली तसेच ग्रामीण भागातील खेळाडू पुढे यावा व त्याला अत्याधुनिक आणि आंतरराष्ट्रीय क्रीडासुविधांचा लाभ मिळावा अशी भावना या स्पर्धेच्या उद्घाटनासाठी उपस्थित असलेल्या



क्रीडास्पर्धांचा जल्लोष

शिक्षणाधिकारी निशादेवी वाघमोडे यांनी व्यक्त केल्या. उपाध्यक्ष महेश नाटेकर यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना, ''खेळामुळे मन आणि शरीर निरोगी होते त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी दिवसातील काही तास मैदानावर खेळावे.'' असे सांगून येथील क्रीडासंकुलाचा लाभ ग्रामीण खेळाडूंना मिळत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. जिल्हा परिषद रत्नागिरी आणि पंचायत समिती चिपळूण यातील विविध पदाधिकारी या स्पर्धाप्रसंगी डेरवण क्रीडानगरीत हजर होते.

या प्रसंगी खास शिक्षकांसाठी एका शिबिराचे आयोजन केले होते. त्यामध्ये क्रीडासंकुलातील जलतरण प्रशिक्षक विनायक पवार यांनी शिक्षकांना संकुलातील सुविधा व



क्रीडास्पर्धांचा जल्लोष

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

प्रशिक्षणाच्या नव्या पद्धती यांची माहिती दिली तसेच खेळाडूंची मानसिकता, खेळाडूंची तंदुरुस्ती या विषयीची माहिती विशाल पवार यांनी दिली. जिल्ह्याच्या विविध भागातून मोठ्या संख्येने आलेल्या प्रेक्षक मंडळींनी स्पर्धेच्या जल्लोषात भर घातली. या स्पर्धेत मंडणगड, संगमेश्वर, गुहागर तसेच चिपळूण तालुक्यातील खेळाडूंनी आपली चुणूक दाखवून अनेक रसिकांची मने जिंकली व अतिशय उत्तम खेळाचे प्रदर्शन केले.





*क्रीडास्पर्धांचा जल्लोष*

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून फेब्रुवारी २०२० मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो.) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ०९ फेब्रुवारी | डॉ. मंदार अक्कलकोटकर, पुणे | आयुर्वेदिक तपासणी व उपचार |
| ०९ फेब्रुवारी | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |
| ०९ फेब्रुवारी | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| १५ फेब्रुवारी | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| १५ फेब्रुवारी | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| १५ फेब्रुवारी | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक) | त्वचारोग तज्ज्ञ |
| २३ फेब्रुवारी | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया |
| २३ फेब्रुवारी | डॉ. भावेश पोपट, मुंबई (रेडीऑलॉजीस्ट) | इंटरव्हेंशनल रेडीऑलॉजी तपासणी व उपचार |
| २३ फेब्रुवारी | डॉ. आनंद जोशी, (गॅस्ट्रोएंट्रोलॉजीस्ट), मुंबई | पचनसंस्थेवरील तपासणी व उपचार |

**१) डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
**२) श्रवण यंत्र (बहिरेपणाचे मशीन) व वाचा ऊच्चार तज्ज्ञ (स्पीच थेरपिस्ट) दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी वालावलकर रुग्णालयात भेटतील**

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८४ ७९२२०